अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई — ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :— २१/०२/२०२४

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई. |
| गु.र.क्र | ०५/२०२४ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ सह कलम २०१ भादंवि. |
| आलोसेचे नांव कार्यालयाचा पत्ता | १) श्री संजय मुंजाजीराव घोडजकर, सह दुय्यम निबंधक,<br>२) श्रीमती दिपा अर्जुन गुजरे, वरिष्ठ लिपीक,<br>नेमणूक - सह दुय्यम निबंधक, कुर्ला ४, मुंबई उपनगर, नाहूर, मुंबई<br>३) श्री सिध्देश विकास मोरे, खाजगी इसम |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | आलोसे क्र. १ यांनी रूपये २५,०००/- व आलोसे क्र. २ यांनी रूपये ५,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रूपये २४,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी हे एका खाजगी सल्लागार संस्थेत काम करतात. सदर संस्था दस्त नोंदणी, अभिहस्तांतरण, अधिकार अभिलेखात नाव दाखल करणे व इतर प्रकारच्या दस्त नोंदणीचे काम करते.<br>दिनांक १५/०२/२०२४ रोजी फिर्यादी यांनी त्यांना प्राप्त असलेल्या अधिकार पत्रान्वये सह दुय्यम निबंधक कुर्ला ४, नाहूर, मुंबई येथे एक दस्त नोंदणी केला होता. सदर दस्तांच्या कागदपत्रांची स्कॅनिंग करून देण्याकरीता व मुळ दस्ताची प्रत देण्याकरीता यातील लोकसेवक क्र. ०१ यांनी रूपये २५,०००/- व लोकसेवक क्र. ०२ यांनी रूपये ५,०००/- ची मागणी केली होती. फिर्यादी यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २०/०२/२०२४ रोजी ला.प्र.वि., मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहून लेखी तक्रार अर्ज दिला.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २०/०२/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक क्र. १ व लोकसेवक क्र. २ यांनी पंचासमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ केलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक क्र. १ यांनी पंचासमक्ष तडजोडीअंती त्यांचे हिश्याची लाच रक्कम रूपये २४,०००/- स्विकारली म्हणून त्यांना ताब्यात घेण्यात आले. परंतु आलोसे यांच्या ताब्यात लाचेची रक्कम मिळुन आली नाही. यातील आरोपी क्र. ३ व लोकसेवक क्र. १ यांनी पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने लाचेच्या रक्कमेची कोठेतरी विल्हेवाट लावल्याचे निष्पन्न झाल्याने उपरोक्त नमूद आलोसे क्र. १, २ व खाजगी इसम यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ सह भा.द.वि. कलम २०१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी :-** **श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.**
**श्री. राजेंद्र सांगळे सो, अपर पोलीस उप आयुक्त,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बृहन्मुंबई विभाग.**
**श्री. भागवत सोनावणे सो, अपर पोलीस उप आयुक्त,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बृहन्मुंबई विभाग.**

सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
सत्यमेव जयते
बृहन्मुंबई

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| **संपर्क** | - | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३० |
| **संकेतस्थळ** | - | acbmaharastra.gov.in, |
| **ईमेल** | - | 1) acbwebmail@mahapolice.gov.in, 2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in. |
| **ऑनलाईन तक्रार अर्ज** | - | 1) www.acbmaharastra.net. |
| **टोल फ्रि. क्र.** | - | १०६४ |
| **दुरध्वनी क्रमांक** | - | ०२२ २४९२१२१२ **फॅक्स क्र.** ०२२२४९२२६१८, **व्हॉटसअप क्र.** ९९३०९९७७०० |